९८९/-

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३०५/प्रनिप्रा/२८फेब्रु./२०२४/528 दिनांक : 12/3/24

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, **दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७७व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ व २) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, ३) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ४) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे निमंत्रित संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ : प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २४/०१/२०२४ व २५/०१/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७५ व ७६ व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २४/०१/२०२४ व २५/०१/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७५ व ७६ व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ७५ व ७६ व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २४/०१/२०२४ व २५/०१/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७५ व ७६व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| बैठक दिनांक : २४/०१/२०२४ | | | |
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७४ व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी झालेल्या ७४ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक २७/१२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| २. | २ (अ.क्र. ४) | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ४, ९ व १० नुसार शैक्षणिक वर्षाच्या सामाईक प्रवेश परीक्षा / केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया / प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया / प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा तपशील / पुनर्विलोकन याचिका अर्जाची प्रक्रिया याकरिता ऑनलाईन / ऑफलाईन (सध्या अस्तित्वात असलेली व प्रस्तावित पध्दतीने) राबविण्यात आलेल्या प्रक्रियेचा आढावा अवलोकनार्थ सादर.<br>कार्यवाही / निर्देश : या संदर्भात सीईटी कक्षाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.<br>*पुढील बैठकीत सादर करण्याचे (दि.२४/०१/२०२४ रोजीच्या बैठकीतील) निर्देश देण्यात आले.* | सीईटी कक्षाकडून CET/CAP बाबत ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने (सध्या अस्तित्वात असलेली / प्रस्तावित पध्दती) कार्यपद्धतीची माहिती अप्राप्त आहे. पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ३. | २ (अ.क्र. ८) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयांनी सादर केलेल्या उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व इतर संचालनालकांच्या फेरपडताळणी अहवालानुसार पात्र प्रवेशांना मान्यता देण्याबाबत. | उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व वैद्यकीय विभागाची ३१ महाविद्यालयांचा अहवाल विषय क्र. ६(घ) वर मान्यतेसाठी सादर करण्यात आला. प्राधिकरणाच्या निर्देशानुसार संबंधित संचालकांकडून फेरपडताळणी अहवाल प्राप्त होतील त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत. |
| ४. | २ (अ.क्र. ९) | मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट विधी महाविद्यालय, नवी मुंबई या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमाचे प्रवेश मान्यता प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत. | या संदर्भात महाविद्यालयास दिनांक ०१/०३/२०२४ रोजीच्या ईमेलद्वारे मान्यता पत्र निर्गमित करण्यात येत आहे. |
| ५. | २ (अ.क्र. १२) | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना सामाईक प्रवेश परीक्षांच्या वॉर रुमचे मानधन, केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांचे मानधन तसेच दिवाळी सानुग्रह अदा करण्याबाबत अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर | दिनांक २/०२/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| ६. | ४ | सीईटी कक्षाच्या "Creating learning / testing centres in Maharashtra for Strengthening of Common Entrance Test Cell infrastructure" या प्रस्तावाच्या मान्यतेबाबत. | राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. CLTC तयार करण्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया सविस्तर ~~पत्रे~~ प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ७. | ५ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर तंत्र शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे. | प्रस्तूत प्रकरणी १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी प्रक्रिये संदर्भात उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ८. | ६(क) | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास एस.बी जैन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज ॲन्ड रिसर्च, नागपुर येथे प्रवेशित कु.शुभांगी शिवराज कोंडे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (याचिका क्रमांक ५५९६/२०१९) | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २३/०२/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आला आहे. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ९. | ६(ख) | युनिवर्सल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मुंबई या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम व द्वितिय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यता प्रस्तावांना मान्यता देण्याबबात. | प्राधिकरणाचे निर्णय संबंधितांना दिनांक १६/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| १०. | ६(ग) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ एज्युकेशन, परभणी महाविद्यालयाच्या बी.एड अभ्यासक्रमातील मान्यतेबाबत प्राधिकरणाच्या निर्णयानुसार महाविद्यालयास रुपये १ लाख दंड माफ करण्याबाबत. | प्राधिकरणाचा निर्णय संबंधितांना दिनांक २३/०२/२०२४ रोजीच्या पत्राने कळविण्यात आला आहे. |
| ११. | ६(घ) | मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अर्जनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर. | प्रवेश मान्यतेबाबत सर्व संबंधित विद्यापीठ / संचालक / महाविद्यालय / विद्यार्थी यांना कळविण्यात आले आहे. |
| १२. | ६(ङ) | श्री. मोहन विष्णू तांबे यांच्या दिनांक २९/१२/२०२३ रोजीच्या मुदतवाढ व मानधन वाढ मिळणेबाबत अर्जावर निर्णय घेणे | प्राधिकरणाच्या निर्णयानुसारा दिनांक ३१/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यवाही करण्यात आली आहे. (आदेश सोबत जोडला आहे.) |
| **बैठक दिनांक : २५/०१/२०२४** | | | |
| १३. | १ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर कृषी शिक्षण, उच्च शिक्षण व कला शिक्षण शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे. | प्रस्तूत प्रकरणी १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी प्रक्रिये संदर्भात उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

विषय क्रमांक ३: शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर तंत्र शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे. {B. Architecture, B. Pharmacy, Pharm D., Pharm D. (P.B.), DSE (Direct Second Year Degree Engineering), DSP(Direct Second Year Pharmacy) }

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितीतील



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय प्राप्त झालेल्या अहवालांचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधिल तरतूदींनुसार प्रवेश बंद दिनांकानंतर संचालकांच्या तपासणी अहवालासह विहित पध्दतीनुसार सादर केलेल्या तंत्रशिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची माहिती खालील प्रमाणे आहे,-

| Sr. | Name of the Course | Cut-off-date | Total No. of Colleges | No. of AAP for Approval | Total Admitted Candidate | No. of Approved admissions | No. of Not Approved admissions | No. of cancelled admissions |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| **TECHNICAL EDUCATION** | | | | | | | | |
| 1 | B. Architecture | 12-10-2023 | 66 | 28 | 1005 | 1004 | 01 | 0 |
| 2 | B. Pharmacy | 15-09-2023 | 443 | 252 | 16971 | 16825 | 61 | 85 |
| 3 | Pharm D | 15-09-2023 | 23 | 16 | 419 | 418 | 01 | 0 |
| 4 | Pahrm D (PB) | 15-09-2023 | 06 | 04 | 31 | 31 | 00 | 0 |
| 5 | DSE (Direct Second Year Degree Engineering) | 25-09-2023 | 311 | 232 | 24721 | 24667 | 54 | 0 |
| 6 | DSP (Direct Second Year Degree Pharmacy) | 21-09-2023 | 325 | 211 | 4382 | 4381 | 01 | 0 |
| | **Total (A)** | | **1174** | **743** | **47529** | **47326** | **118** | **85** |

महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांबाबत अवलोकन करुन खालील प्रमाणे निर्देश देण्याात येत आहे,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. सबब याबाबत नोंद घेण्यात आली.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

४) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये उपसमिती गठित करण्यात आली आहे.

५) अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावातील प्रवेशित माहिती व ऑनलाईन संगणक प्रणालीमधील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती तसेच काही प्रकरणी संचालकांचा तपासणी अहवाल यामध्ये तफावत दिसून आली. सदर प्रकरणी संबंधित सेवा पुरवठादार व संचालक यांच्याकडून माहिती अद्यावत करुन पुढील मान्यतेबाबतची प्रक्रिया पुर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

६) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत व प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम <u>(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तथापि, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

७) तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी उपसमितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि सदरील अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

८) प्रस्तूत प्रकरणी वरील परिच्छेद क्रमांक (७) मध्ये नमूद केल्यानुसार १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे <u>(प्रपत्र-अ)</u>, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार) कार्यवाही करावी.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

९) ज्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा सर्व महाविद्यालयांना प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ दिवसांची संधी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. यासंबंधी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी संबंधित संचालकांमार्फत संबंधित महाविद्यालयांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले. याबाबतचा सविस्तर तपशील प्रपत्र-ब द्वारे सोबत जोडला आहे.

विषय क्रमांक ४: अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदवी औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी डी. हलके या विद्यार्थिनीच्या TFWS कोटयातुन प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावाबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी, पेठ वडगाव, कोल्हापुर (संस्था क्र. ६३५५) या महाविद्यालयात प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमधून कु. वैष्णवी दशरथ हलके या विद्यार्थिनीस प्रवेश मिळालेला असून त्यांचा उपरोक्त नमुद संस्थेमध्ये ओबीसी प्रवर्गातुन प्रवेश निश्चित झालेला आहे. तथापि संबंधित विद्यार्थिनीची आर्थिक परीस्थिती चांगली नसल्यामुळे Tution Fee Waiver Scheme अंतर्गत जी फी आहे ती भरण्यास परवानगी मिळण्याबाबतची विनंती संबंधित विद्यार्थिनीने मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना केली.

तथापि केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान Tution Fee Waiver Scheme प्रवर्गाअंतर्गत एकुण ०५ जागा उपलब्ध होत्या त्यापैकी ०४ जागांवर गुणवत्तेनुसार उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले असून ०१ जागा रिक्त असल्याचे दिसून येते. कु. वैष्णवी दशरथ हलके यांचे सामाईक परिक्षेतील गुण प्रवेशित ०४ विद्यार्थ्यांच्या गुणापैक्षा जास्त आहे. त्यामुळे गुणवत्ताधारक कोणत्याही उमेदवारांवर अन्याय होत नसल्याचे स्पष्ट आहे.

उक्त नमूद बाबी तसेच कु. वैष्णवी डी. हलके यांच्या आर्थिक परिस्थितीचा व शैक्षणिक हिताचा विचार करता सदरील प्रकरण ओबीसी प्रवर्गातुन Tution Fee Waiver Scheme या प्रवर्गात बदल करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी कु. वैष्णवी हलके यांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत नोंदणी तसेच कागदपत्रे पडताळणी केंद्राकडून (FC) योग्य मार्गदर्शन केल्याचे दिसून येत नाही. याबाबत संबंधित FC कडून खुलासा प्राप्त करुन घेण्याचे राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांना निर्देश देण्यात आले.

तसेच सदरील प्रवेशाबाबत प्राधिकरणाच्या पोर्टलवर नोंद घेऊन अद्यावत करण्याबाबत तंत्र शिक्षण विभाग, सीईटी कक्ष यांनी योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी.

विषय क्रमांक ५: सायली चॅरिटेबल ट्रस्टचे कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील थेट द्वितीय वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. प्रभात सुधाकर बागुल या विद्यार्थ्याच्या प्रवेश प्रस्तावाबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सायली चॅरिटेबल ट्रस्टचे, कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री), संभाजीनगर येथे थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान नजरचुकीने एका विद्यार्थ्याच्या कागदपत्रासोबत दुसऱ्या विद्यार्थ्याचे कागदपत्रे एकत्रित जोडण्यात आले असल्याने कु. प्रभात सुधाकर बागूल या विद्यार्थ्याचा प्रवेश अतिरिक्त झालेला आहे.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २०/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्यास कळविले. त्यानुसार संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे,-

> *"......तथापि संस्थेकडून अनावधानाने अतिरिक्त प्रवेश झाल्याचे आढळून येते. या अनुषंगाने महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ मधील कलम २० मधील तरतुदीनुसार संस्थेवर शास्ती आकारुन अतिरिक्त प्रवेश नियमित करण्याबाबत आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन निर्णय घेण्यात यावा."*

३) प्रस्तुत प्रकरणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांचेमार्फत दिनांक ०४/१२/२०२३ रोजी परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. तथापि, अतिरिक्त प्रवेशित कु. प्रभात सुधाकर बागूल ह्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या मौखिक निर्देशानुसार सदर विद्यार्थ्यास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अंतिम प्रवेश मान्यतेच्या अधीन राहून विद्यापीठाच्या आगामी परीक्षेस बसण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठास दिनांक १९/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

४) त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सायली चॅरिटेबल ट्रस्टचे, कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री), संभाजीनगर येथे थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील पुढील वर्षाच्या (शैक्षणिक वर्ष २०२४-२५) प्रवेश क्षमतेमध्ये एक जागा कमी करुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशित कु. प्रभात सुधाकर बागूल या विद्यार्थ्याच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५) तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकाराबाबत संबंधित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमाची ०१जागा कमी करण्याबाबतचा आणि रुपये १ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रवेश प्रक्रिया राबविताना मंजुर प्रवेश क्षमतेमध्ये ०१ जागा कमी करण्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या स्तरावर उचित कार्यवाही करावी.

वरील परिच्छेद क्रमांक (५) मध्ये नमूद केल्यानुसार सायली चॅरिटेबल ट्रस्टचे कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री), संभाजीनगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एक जागा कमी भरणार असल्याचे व दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत संबंधित विद्यापीठास सुध्दा कळवावे, असे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
...क्ष
प्रवे... प्राधिकरण,
राज्य

विषय क्रमांक ६: प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा पुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ प्रस्ताव मान्यतेबाबत.

विषयांकित प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ (बैठक क्रमांक ६९) रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ३(ग) मधील निर्णयाचे अवलोकन करण्यात आले.

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा व वेतनवाढीबाबत कार्यालयाच्या दिनांक २०/०२/२०२४ रोजीच्या टिपणीवर सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत गट - क व गट - ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना वेतन व भत्तेबाबत भोसले समितीच्या अहवालास अनुसरुन माहे २ फेब्रुवारी २०२४ पासून १०% दराने वेतन वाढ करण्याचा तसेच ११ महिन्यांकरिता नियुक्तीस (१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन) मुदतवाढ देण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे (प्रपत्र- क).

तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयातील मंजुर पदांच्या अनुषंगाने कार्यरत कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा निश्चितीबाबत व संबंधित पदांच्या भरतीबाबतचे नियम व पात्रता तपासून प्रस्ताव सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक ३(ग) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

या अनुषंगाने खर्चाचा ताळेबंद व अदांजपत्र दोन्ही विभागांनी पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

विषय क्रमांक ७: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) ME६७९४-अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थी कु. सोहेल गुलमोहम्मद शेख ME (Civil Engineering) या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करण्याकरिता.

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दि. १६/०१/२०२४ रोजीचे श्री. सोहेल गुलमोहम्मद शेख यांची पुणे विद्यापीठ येथील ME (Civil Engineering) च्या पदवीबाबतच्या पत्रास अनुसरुन सादर.

सदर प्रकरणी, श्री. सोहेल गुलमोहम्मद शेख यांच्या प्रवेशाबाबतची कागदपत्रे संपादक, सेक्युलर रायटर, आसिफ खान यांच्या दि.१३/०४/२०२२ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने, पुनःश्च तपासुन त्याचा अहवाल परस्पर विद्यापीठास सादर करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रवेश नियामक



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणांस सादर करण्याबाबत प्राधिकरणाचे दिनांक ९/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संचालक, तंत्रशिक्षण यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने, संचालक, तंत्रशिक्षण यांनी विषयांकित पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

"अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थी कु. सोहेल गुलमोहम्मद शेख ME (Civil Engineering) यांनी MC FORD UNIVERSITY San Francisco, CA United States मधून Bachelor of Civil Engineering Distance Education System, द्वारे अभ्यासक्रम उत्तीर्ण करुन सदर पदवीच्या आधारे सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात चुकीच्या कागदपत्रा आधारे प्रवेश घेतला असल्याची तक्रार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना संपादक असीफ खान यांचे मार्फत प्राप्त झाली होती. त्यावर विद्यापीठाने दिनांक १६.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्री सोहेल गुलमोहम्मद शेख या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करावा किंवा कसे यावर स्पष्ट अभिप्राय देण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणांस विनंती केली होती. त्या अनुषंगाने प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या संदर्भ क्र. १च्या पत्रान्वये संचालनालयाने तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना वस्तुस्थिती सादर करण्यास कळविले होते. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी सदर प्रकरणी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातील प्राध्यापकांची समिती गठीत केली होती. सदर समितीने कागदपत्रांची पडताळणी करुन श्री सोहेल गुलमोहम्मद शेख या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतचा अहवाल सादर केला असून अहवालातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

१) Section ५.१ (Page ५ PG Information Brochure Year २०२०-२१, Section ७.७ (Refer Eligibility Condition Table ME/M.Tech Main Point १ Sub Point ii (Page १६) च्या अनुषंगाने सदर प्रवेश वैध ठरत नाही.

२) Section ७.७ (Refer Eligibility Condition Table ME/M.Tech Main Point १ Sub Point ii (Page १६) च्या तसेच सावित्रीबाई फुले पुणे, युनिव्हर्सिटी, पुणे च्या पदव्युत्तर पदवी पात्रतेविषयीच्या Circular No १३५ of २०२० (Section ९ Page ३९) (Diploma/ Degree/ Post Graduate Degree in Distance Mode/Open University is not Eligible at Degree/Post Graduate/Ph.D. Level/M.E., M.Tech Courses) च्या अनुषंगाने श्री सोहेल गुलमोहोम्मद शेख यांची पदवी Distance Mode मधील असल्यामुळे सदर प्रवेश वैध ठरत नाही.

सदर समितीने सादर केलेल्या निष्कर्षास सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी सहमती दर्शविली आहे. त्यामूळे श्री सोहेल गुलमोहम्मद शेख यांनी ME (Civil Engineering) अभ्यासक्रमास घेतलेला प्रवेश वैध ठरत नाही. त्यानुसार आपल्या स्तरावर प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करण्याचे संचालकांना पत्रात नमूद केले आहे.

प्रस्तूत प्रकरणी संचालक यांच्या दिनांक १८/०५/२०२१ रोजीच्या तपासणी अहवालानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाने दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीत प्रवेश मान्यतेचा निर्णय घेण्यात आलेला होता. व त्याअनुषंगाने महाविद्यालयाला दिनांक ३/१२/२०२१ रोजीच्या मान्यता पत्राने मान्यता कळविण्यात आलेली होती. सदर मान्यता पत्रातील अंतिम परिच्छेदामध्ये मान्यता देण्यात आलेल्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या माहितीमध्ये चूक आढळल्यास असे प्रवेश कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाचे प्रवेश नियमावली / माहिती पुस्तिकातील संबंधित नियम व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांची दिनांक १६/०१/२०२४ रोजी सादर केलेला पडताळणी अहवाल इत्यादी बाबी विचारात घेता अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थी कु. सोहेल गुलमोहम्मद शेख ME (Civil Engineering) या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

तसेच प्रस्तूत प्रकरणी सह-संचालक, विभागीय कार्यालय, पुणे यांनी यापूर्वी या प्रवेशास शिफारस केली असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असून प्राधिकरण याबाबत नोंद घेत आहे व सह-संचालक, विभागीय कार्यालय, पुणे यांच्याकडून भविष्यात अशी चूक पुनश्च होऊ नये, याबाबत समज देण्यात येत आहे.

(ख) <u>"शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित झालेल्या मात्र प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पोर्टलवर नाव समाविष्ट न झालेल्या" परंतु, महाविद्यालयात प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाच्या मान्यतेबाबत.-</u>

(१) <u>तात्यासाहेब कोरे ईन्स्टिटयुट ऑफ इंजिनीयरींग ॲण्ड टेक्नोलॉजी, कोल्हापुर येथे थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित ०१ विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत..</u>

(२) <u>सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित ०१ विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत..</u>

(३) <u>कै.भागीरथी यशवंतराव पाथ्रीकर फार्मसी कॉलेज, पाथरी फुलंब्री अमरावती येथे थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित ०१ विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील खाजगी विनाअनुदानित थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी व थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतचा दि.१८/०५/२०२१ रोजीचा पडताळणी अहवाल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सादर केला होता.

सदर अहवालानुसार सदर संस्थांमध्ये प्रवेशित झालेल्या मात्र सीईटी कक्ष/प्राधिकरण कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये एकुण १४ विद्यार्थ्यांचा तपशील नसल्याचे प्राधिकरणांस अवगत केले होते.

या अनुषंगाने सदर प्रकरणी प्राधिकरणाच्या दि.११/०६/२०२१ रोजीच्या बैठकीत उपरोक्त विद्यार्थ्यांचा तपशील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना तपासणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, संचालकांनी दि.१३/१०/२०२१ व १०/०१/२०२३ रोजींच्या पत्रान्वये "शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित झालेल्या मात्र प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पोर्टलवर नाव समाविष्ट न झालेल्या" ३० विद्यार्थ्यांबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्याचप्रमाणे राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी दि.१०/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उपरोक्त प्रमाणे प्राप्त अहवालांनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील २७ व थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील ०३ असे एकुण ३० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतचा स्पष्ट खुलासा करण्यात आलेला आहे.

या प्रवेशांपैकी १) तात्यासाहेब कोरे ईन्स्टिटयुट ऑफ इंजिनीयरींग ॲण्ड टेक्नोलॉजी, कोल्हापुर, २) सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावती व ३) कै.भागीरथी यशवंतराव पाथीकर फार्मसी कॉलेज, पाथरी फुलंब्री या महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील "शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित झालेल्या मात्र प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पोर्टलवर नाव समाविष्ट न झालेल्या" प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत विनंती केलेली आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने, खालील ३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे,-

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Course | Application ID | Candidate Name | Approval Status |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6268 | Tatyasaheb Kore Institute of Engineering and Technology, Warananagar | Civil Enginnering | DSE20134779 | Patil Akshay Subhash | Approved |
| 2 | 1114 | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology, Amravati | Civil Enginnering | DSE20125099 | Mugal Dhairya Vinod | Approved |
| 3 | 2582 | Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar College of Pharmacy, At Pathri Phulambri | Direct Second Year Pharmacy | DSP20108093 | Suradkar Gaurav Ganesh | Approved |

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमाचा प्रवेशित कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थिनीचा प्रवेश संस्थाबदल करणेबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे दिनांक २६/१२/२०२३ रोजीचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष पदवी वास्तुशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशति कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थिनीच्या संस्था स्थलांतरणा बाबतच्या पत्राचे अवलोकन करण्यात आले.

विद्यावर्धनचे आयडिया ईन्स्टिटयुट ऑफ डीझाईन एनवायरमेंट ॲण्ड आर्किटेक्चर, नाशिक या महाविद्यालयात प्रथम वर्ष वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थिनीच्या संबंधीत महाविद्यालयात प्रथम वर्ष वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमात सदर एकाच विद्यर्थिनीचा प्रवेश झालेला



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

असल्याने नाशिक मधील दुस-या अन्य वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात संस्थाबदल करुन मिळणेबाबतच्या प्रकरणी अनुषंगिक कार्यवाही करण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयास प्राधिकरणाच्या दिनांक २०/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, संचालकांनी दिनांक २६/१२/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन परवानगी देण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.

१) सदर संस्था बदलीने समायोजन कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थीनीने प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना सादर केलेल्या विकल्पानूसार करण्यात येत असल्याने कोणत्याही शैक्षणिक परिणामास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील, तसेच उमेदवाराची मुळ कागदपत्रे संस्थेकडून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवार तथा त्यांच्या पालकांची राहील.

२) संबंधित विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे. उपस्थिती पूर्ण करणे व विहीत अभ्यासक्रम आणि टर्मवर्क पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

३) Annexure A मधील विद्यार्थ्याच्या संस्था स्थलांतरणबाबत प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र दिनांक २०.१२.२०२३ नुसार संबंधित संस्थेतील रिक्त जागा विचारात घेऊन करण्यात येत आहे.

तसेच संचालनालयाने प्राधिकरणाच्या दिनांक २०/१२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार संस्था स्थलांतरबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे.

वरील बाबी विचारात घेता विद्यावर्धनचे आयडिया ईन्स्टिटयुट ऑफ डीझाईन एनवायरमेंट ॲण्ड आर्किटेक्चर, नाशिक या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष पदवी वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैदेही सुयोग बल्लारीकर या विद्यार्थिनीच्या प्रवेशास उपरोक्त अटी व शर्तींच्या अधीन राहुन एमईटीचे स्कुल ऑफ आर्किटेक्चर, नाशिक या संस्थेत संस्था स्थलांतरणास संचालनालयाच्या दिनांक २६/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. संचालकांच्या सदर संस्था स्थलांतरणाबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच कु. वैदेही यांना त्यांच्या विद्यावर्धनचे आयडिया ईन्स्टिटयुट ऑफ डीझाईन एनवायरमेंट ॲण्ड आर्किटेक्चर, नाशिक प्रवेशानुसार फी बाबत अनुज्ञेय असलेले सर्व लाभ/फायदे स्तलांतरीत केलेल्या एमईटीचे स्कुल ऑफ आर्किटेक्चर, नाशिक या महाविद्यालयास मिळण्यास पात्र राहील.

तथापि विद्यावर्धनचे आयडिया ईन्स्टिटयुट ऑफ डीझाईन एनवायरमेंट ॲण्ड आर्किटेक्चर, नाशिक यांच्या कडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत रुपये १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(घ) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये जी. एच.रायसोनी इंन्स्टिट्यूट ऑफ लाईफ सायन्सेस, नागपुर येथे व्यावसायिक प्रथम वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित ६० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये व्यावसायिक पदवी औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास जी.एच्.रायसोनी इंस्टिट्यूट ऑफ लाईफ सायन्सेस, नागपूर येथील प्रवेशित ६० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत कार्यालयीन सादर केलेल्या प्रवेशाबाबतच्या माहितीची नोंद घेण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेप्रकरणी मा. सचिव, यांनी सादर केले की, याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २०/०२/२०२४ रोजी सुनावणी झाली असून त्यामध्ये संस्थेच्या वकिलांनी न्यायालयास केलेल्या सादरीकरणच्या अनुषंगाने मा. आयुक्त, राज्य सामईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. तसेच, याप्रकरणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केलेल्या कार्यवाहीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. यामुळे याप्रकरणी शासनाच्या / राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने बाजू मांडण्यासाठी ॲडिशनल सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याप्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०५/०३/२०२४ रोजी असून मा. न्यायालयाच्या निर्णयाबाबत प्राधिकरणास पुढील बैठकीत अवगत करण्यात येईल.

(ङ) <u>मा.प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अर्जनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर.</u>

प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ व २४/०१/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता सोबत जोडलेल्या **<u>प्रपत्र- ङ</u>** मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा ही गंभीर बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालयास **<u>प्रपत्र-ङ मध्ये नमूद केल्यानुसार</u>** दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा " 60249481321" (IFSC Code : MAHB0000310) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच या संदर्भात उर्वरित प्रकरणे प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(च) <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सामाईक प्रवेश परिक्षेचे वेळापत्रक अवलोकनार्थ सादर.</u>

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सामाईक प्रवेश परिक्षेचे वेळापत्रक आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या वेळापत्रकाची नोंद घेण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : 12/3/24